## आजचे पंचांग

दिनांक : २५ जुलै २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : एकादशी तिथी (सकाळी ११:३४ पर्यंत) त्यानंतर द्वादशी तिथी नक्षत्र : ज्येष्ठा नक्षत्र (२६ जुलै सकाळी ०७:३४ पर्यंत) त्यानंतर मूळ नक्षत्र योग : ब्रह्म योग (रात्री ०९:०८ पर्यंत) त्यानंतर इन्द्र योग करण : विस्ती भद्रा करण (सकाळी ११:३४ पर्यंत)

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## पवना धरण ९३.०८ टक्के भरले

**पुणे :** मावळ तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. गुरुवारी (२३ जुलै) सायंकाळी ६ वाजेपर्यंत पवना धरण ९३.०८ टक्के भरले असून, धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोणत्याही क्षणी पवना नदीपात्रात कमी-अधिक प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येण्याची शक्यता असल्याचा महत्त्वाचा इशारा जलसंपदा विभागाने दिला आहे. त्यामुळे पवना नदीकाठच्या गावांमधील नागरिक, शेतकरी, व्यावसायिक तसेच लाभधारकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. २५ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - २९७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### केंद्रीय मंत्र्याचा राजीनामा, कलम ७५(२) अंतर्गत राष्ट्रपतींकडून तडकाफडकी मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील केंद्रीय रेल्वे आणि अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सल्ल्यानुसार, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी, संविधानाच्या कलम ७५(२) नुसार त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. यासंदर्भात राष्ट्रपती भवनाकडून अधिकृत पत्रकाद्वारे माहिती देण्यात आली आहे. खरे तर, रवनीत सिंग बिट्टू यांचा राज्यसभा खासदारकीचा कार्यकाळ २१ जून रोजीच संपुष्टात आला होता.

का दिला राजीनामा? -

भारतीय जनता पक्षाने १८ जून रोजी पार पडलेल्या राज्यसभा निवडणुकीत बिट्टू यांना पुन्हा उमेदवारी दिली नव्हती. त्यांचा खासदारकीचा कालावधी संपल्यानंतर त्यांनी आज (शुक्रवार) त्यांच्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. महत्वाचे म्हणजे, पुढील वर्षात होणाऱ्या पंजाब विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांनी राजीनामा दिल्याची चर्चा आहे.

काँग्रेस ते भाजप अन् मोदी सरकारमध्ये मंत्री - रवनीत सिंह बिट्टू हे पंजाबचे माजी मुख्यमंत्री दिवंगत बेअंत सिंह यांचे नातू आहेत. त्यांनी २४ मार्च २०२४ रोजी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांनी २००९ मध्ये आनंदपूर साहिब आणि त्यानंतर, २०१४ आणि २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत लुधियाना मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढली होती आणि विजयी झाले होते. यानंतर, मार्च २०२१ ते जुलै २०२१ या काळात त्यांनी लोकसभेत काँग्रेस नेते म्हणून काम बघितले.

# विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके की लाठ्या? दिल्लीतील लाठीचार्जाने सरकारला "Gen Z'चा थेट सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / नवी दिल्ली :** दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावर झालेल्या पोलिस लाठीचार्जानंतर केवळ विरोधकच नव्हे, तर देशातील नव्या पिढीनेही केंद्र सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. परीक्षेतील कथित गैरव्यवहार, पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील उत्तरदायित्वाची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठ्या चालवल्या जात असतील, तर लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा अधिकार नेमका कुठे उरतो, असा सवाल आता देशभरातून उपस्थित होत आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही या कारवाईवर थेट भाष्य करत सरकारला कठोर प्रश्न विचारले आहेत. शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारहाण केली तर त्यांच्यावर कारवाई होते. मग आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार करणाऱ्या पोलिसांवर आणि त्यांना आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई का होत नाही? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

दिल्लीतील आंदोलन हे कोणत्याही राजकीय सत्तांतरासाठी नव्हते. ते विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर होते. नीट (छएएढ) परीक्षा, कथित पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना न्याय या मागण्यांसाठी विद्यार्थी रस्त्यावर उतरले होते. मात्र या आंदोलनाचे उत्तर संवादाने नव्हे, तर पोलिसी बळाने दिले गेल्याचा आरोप होत आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या अनेक व्हिडिओंमध्ये आंदोलनकर्त्यांसोबतच परिसरातील इतर नागरिकांनाही मारहाण झाल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर केवळ लाठी चालवणाऱ्या पोलिसांची नव्हे, तर त्यांना आदेश देणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का, हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे.

राज ठाकरे यांनी आपल्या भूमिकेत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. पोलिस अनेकदा वरिष्ठांच्या आदेशानुसार कारवाई करतात. त्यामुळे प्रत्येक घटनेत केवळ पोलिसांनाच दोषी ठरवून चालणार नाही. बळाचा वापर करण्याचा आदेश कोणी दिला, तो कायदेशीर होता का आणि तो प्रमाणबद्ध होता का, याचीही स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे.

संयुक्त राष्ट्रसंघ तसेच ॲम्नेस्टी इंटरनॅशनलनेही आंदोलने हाताळताना बळाचा वापर हा अत्यावश्यक, कायदेशीर, प्रमाणबद्ध आणि उत्तरदायित्वाच्या चौकटीत असला पाहिजे, असे स्पष्ट तत्त्व मांडले आहे. नॉर्वे, जर्मनी, स्वीडन, फिनलंड, डेन्मार्क आणि न्यूझीलंडसारख्या देशांमध्ये पोलिसांकडून बळाचा वापर झाल्यास त्याची स्वतंत्र चौकशी केली जाते. भारतातही अशीच उत्तरदायित्वाची व्यवस्था असावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

या घटनेने आणखी एक वास्तव समोर आणले आहे. ऋशप न ही पिढी केवळ सोशल मीडियावर प्रतिक्रिया देणारी नाही; ती सरकारला थेट प्रश्न विचारणारी पिढी आहे. रोजगार, शिक्षण, परीक्षा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या मुद्द्यांवर ती अधिक सजग आहे. त्यामुळे प्रत्येक आंदोलनाला केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहण्याऐवजी त्यामागील असंतोष समजून घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

लोकशाहीत आंदोलन हा घटनात्मक अधिकार आहे. कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; मात्र शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर झाल्याचे आरोप होत असतील, तर त्याची निष्पक्ष चौकशीही तितकीच आवश्यक आहे. अन्यथा प्रश्न विचारणाऱ्या तरुणांना उत्तराऐवजी लाठ्या मिळत आहेत, अशी भावना अधिक तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## कायदा दोषींवर, पण जबाबदारी कोणाची? पेपरफुटीवर १० वर्षांच्या शिक्षेचा कायदा; मग शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याचा प्रश्न टाळला का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली / प्रतिनिधी** देशभरातील स्पर्धा परीक्षा आणि नीट (छएएढ) पेपरफुटीच्या वादानंतर केंद्र सरकारने कठोर कायदेशीर पाऊल उचलत दोषींना १० वर्षांपर्यंत कारावास, १० कोटी रुपयांपर्यंत दंड आणि तीन महिन्यांत खटल्याचा निकाल देण्याची तरतूद असलेल्या सुधारित विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी दिली आहे. मात्र, या निर्णयानंतरही विरोधक आणि विद्यार्थी संघटनांकडून एकच प्रश्न उपस्थित केला जात आहेपेपरफुटी करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार, पण परीक्षा व्यवस्थेच्या अपयशाची राजकीय जबाबदारी कोण घेणार?

नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या विधेयकाला मंजुरी देण्यात आली. सरकारच्या म्हणण्यानुसार, संघटित पेपरफुटी रॅकेट मोडून काढणे, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण करणे हा या कायद्यामागील उद्देश आहे. प्रकरणांची सुनावणी विशेष फास्ट ट्रॅक न्यायालयात होऊन तीन महिन्यांत निकाल देण्याची तरतूदही प्रस्तावित करण्यात आली आहे. मात्र, दुसरीकडे देशभरातील विद्यार्थी संघटना आणि विरोधी पक्षांचा सूर वेगळाच आहे. त्यांचे म्हणणे आहे की, कायदा आवश्यक आहे; पण तो प्रशासनाच्या आणि राजकीय उत्तरदायित्वाच्या प्रश्नाला पर्याय ठरू शकत नाही.

दिल्लीत झालेल्या विद्यार्थी आंदोलनात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, जर लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित परीक्षांमध्ये गंभीर त्रुटी झाल्या असतील, तर केवळ गुन्हेगारांना शिक्षा करून प्रश्न संपत नाही. त्या व्यवस्थेची जबाबदारी स्वीकारणाऱ्यांनाही उत्तर द्यावे लागेल. सरकारचा युक्तिवाद असा आहे की, पेपरफुटी हा संघटित गुन्हेगारीचा विषय असून दोषींवर कठोर कारवाईसाठी कायदेशीर चौकट मजबूत केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यापूर्वी पेपर लीक ही साधी घटना नसून लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित गंभीर बाब आहे, असे म्हणत कठोर कायद्याचे संकेत दिले होते. दरम्यान, दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी आणि केंद्र सरकारच्या प्रतिनिधींमध्ये बैठक झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासह परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरप्रकारांची जबाबदारी निश्चित करणे आणि आंदोलनादरम्यान दाखल गुन्हे मागे घेण्याची मागणी केली. याच पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहेसरकारने गुन्हेगारांसाठी कठोर शिक्षा निश्चित केली, पण परीक्षा व्यवस्थेतील प्रशासकीय किंवा राजकीय जबाबदारीबाबत कोणती स्पष्ट भूमिका घेतली आहे का? लोकशाही व्यवस्थेत एखाद्या मंत्र्याचा राजीनामा हा राजकीय निर्णय असतो; तो न्यायालयीन शिक्षेचा पर्याय नसतो आणि कोणत्याही गुन्ह्याची दोषसिद्धी झाल्याशिवाय तो कायदेशीरदृष्ट्या बंधनकारकही नसतो. मात्र, मोठ्या प्रशासकीय अपयशाच्या घटनांमध्ये नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची अपेक्षा विरोधक आणि नागरिकांकडून व्यक्त केली जाते. सरकार आता कठोर कायद्याच्या माध्यमातून पेपरफुटीवर लगाम घालण्याचा दावा करत असताना, विद्यार्थ्यांचा प्रश्न मात्र अद्याप कायम आहेदोषींना शिक्षा होईल; पण परीक्षा व्यवस्थेच्या अपयशाची राजकीय जबाबदारी नेमकी कोण स्वीकारणार?

## लाडकी बहीण'ची अंतिम यादी जाहीर; ८०.७१ लाख महिला अपात्र, CAGच्या 'मतांसाठी रोख' ताशेऱ्यांनंतर सरकारची मोठी छाटणी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी आणि सर्व प्रकारची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर राज्य सरकारने अंतिम लाभार्थी यादी जाहीर केली आहे. त्यानुसार राज्यातील १ कोटी ६६ लाख २८ हजार ४८ महिला पात्र ठरल्या असून ८० लाख ७१ हजार ९५२ महिला अपात्र ठरल्या आहेत. पडताळणीनंतर पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात जून महिन्याचे अनुदान जमा करण्यात आले आहे.

या योजनेसाठी सुरुवातीला सुमारे २ कोटी ४७ लाख अर्ज प्राप्त झाले होते. मात्र, कागदपत्रे, उत्पन्न, पात्रता आणि ई-केवायसीच्या सखोल पडताळणीनंतर मोठ्या प्रमाणावर अर्ज बाद करण्यात आले. पडताळणीदरम्यान सुमारे २४ लाख महिलांनी चुकून स्वतः ला शासकीय कर्मचारी म्हणून नोंदविल्याचे समोर आले. सरकारने दुरुस्तीसाठी चार महिन्यांची मुदत दिल्यानंतर त्यापैकी २० लाख महिलांनी माहिती दुरुस्त करून पात्रता मिळवली, तर उर्वरित ४ लाख महिला अपात्र राहिल्या.

अंतिम यादीनंतर सरकारचा या योजनेवरील मासिक खर्च २,४५९ कोटी रुपये इतका राहणार असून, यामुळे वार्षिक सुमारे १२ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, या योजनेवर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (उअॠ) यांनी अलीकडील अहवालात गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. निवडणुकीपूर्वी सुरू करण्यात आलेल्या या योजनेबाबत आर्थिक शिस्त, निधीचे नियोजन आणि 'मतांसाठी रोख' (उरीह षेअॅ तींशी) स्वरूपाच्या लोकलाडावू धोरणांबाबत उअॠ कठोर निरीक्षणे नोंदविल्याची चर्चा आहे. अशा पार्श्वभूमीवर आता मोठ्या प्रमाणावर लाभार्थ्यांची छाटणी करण्यात आल्याने सरकारवर विरोधकांकडून राजकीय हेतूने योजना राबविल्याचा आरोप अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी ई-केवायसी आणि पडताळणीमुळे योजना अधिक पारदर्शक झाल्याचा दावा केला. अपात्र लाभार्थ्यांच्या आकडेवारीबाबत विरोधकांकडून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचाही आरोप त्यांनी केला. दरम्यान, सरकारने स्पष्ट केले आहे की इतर कल्याणकारी योजनांप्रमाणेच 'लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थ्यांची नियमित पडताळणी सुरू राहील. तसेच ६५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर संबंधित महिलांचे नाव लाभार्थी यादीतून आपोआप वगळले जाईल.

## भीतीदायक' ते 'जनस्नेही' आयकर विभागाचा बदलता चेहरा; राज्यपालांकडून कौतुक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी** राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील कौटिल्य भवन येथे आयकर विभागाचा १६७ वा स्थापना दिन (आयकर दिन) उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राज्यपालांनी आयकर विभागाच्या बदलत्या कार्यपद्धतीचे कौतुक करत, एकेकाळी भीतीदायक म्हणून ओळखला जाणारा आयकर विभाग आज जनस्नेही मित्र बनला आहे, असे गौरवोद्गार काढले.

तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, कर भरण्याची सुलभ प्रक्रिया, वाढलेली पारदर्शकता आणि करदात्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी आयकर विभागाने केलेल्या प्रयत्नांचे राज्यपालांनी विशेष कौतुक केले. भारत ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना आयकर विभागाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. देशाच्या विकासात कर महसुलाचे मोठे योगदान असल्याचे सांगताना राज्यपाल म्हणाले की, सार्वजनिक शाळा, रुग्णालये, रस्ते, पायाभूत सुविधा आणि विविध कल्याणकारी योजना करदात्यांच्या योगदानामुळेच साकार होत आहेत. महाराष्ट्राचा देशातील प्रत्यक्ष कर संकलनात सर्वाधिक वाटा असून, मुंबईने देशाची आर्थिक राजधानी म्हणून आपले स्थान कायम राखले आहे, असेही त्यांनी नमूद केले. मुंबई मेट्रो, कोस्टल रोड, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक आणि मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प हे करदात्यांच्या योगदानाची जिवंत उदाहरणे असल्याचे सांगून त्यांनी प्रत्येक नागरिकाने अग्रीम कर भरणे ही सामाजिक जबाबदारी समजून पार पाडावी, असे आवाहन केले. कार्यक्रमात मुंबईचे प्रधान मुख्य आयकर आयुक्त आलोक कुमार यांनी आयकर विभागातील डिजिटल बदलांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, आयकर विवरणपत्र (खढठ) भरण्याची प्रक्रिया आता ऑनलाइन खाद्यपदार्थ मागविण्याइतकी सुलभ झाली आहे. २०१९ मध्ये आयकर विवरणपत्रावर प्रक्रिया होण्यासाठी सरासरी ८२ दिवस लागत होते, तर आता ती काही दिवसांत पूर्ण होत असून कर परताव्याची (रिफंड) रक्कमही अधिक वेगाने वितरित केली जात आहे.

## संसद चलो' आंदोलनावर पोलिसांची कारवाई; लोकशाहीतील आंदोलनाचा अधिकार पुन्हा चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी** 'संसद चलो' आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईनंतर लोकशाहीतील आंदोलनाचा अधिकार, पोलिस बळाचा वापर आणि घटनात्मक स्वातंत्र्य यावर पुन्हा एकदा व्यापक चर्चा सुरू झाली आहे. आंदोलन करणाऱ्या नागरिकांना 'जमाव' म्हणून संबोधून सामूहिक बळाचा वापर योग्य ठरवला जातो का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

२० जुलै २०२६ रोजी जंतर-मंतर परिसरात विविध विद्यार्थी संघटनांनी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत 'संसद चलो' आंदोलन आयोजित केले होते. नीट (छएएढ) प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी जबाबदारी निश्चित करणे, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींवर कारवाई करणे आणि परीक्षा तणावामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्याची मागणी आंदोलकांनी केली.

आंदोलकांनी संसदेकडे मोर्चा वळविण्याचा प्रयत्न केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (इछड) कलम १६३ लागू असल्याचे सांगत पुढे जाण्यास परवानगी नाकारली. त्यानंतर उभारण्यात आलेल्या बॅरिकेड्सजवळ आंदोलक आणि पोलिसांमध्ये धक्काबुक्की झाली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिस आणि रॅपिड ॲक्शन फोर्सने लाठीचार्ज व अश्रुधुराचा वापर केल्याचे दृश्य विविध माध्यमांमधून समोर आले.

दिल्ली पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या कारवाईत वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ११८ हून अधिक पोलिस व सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. आंदोलकांकडून दगडफेक, बॅरिकेड्स तोडण्याचा प्रयत्न, शासकीय वाहनांची तोडफोड आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या काही व्हिडिओंमुळे नवा वाद निर्माण झाला आहे. या व्हिडिओंमध्ये गणवेश किंवा ओळखपत्र नसलेले काही व्यक्ती पोलिसांसोबत आंदोलकांवर लाठ्या चालवताना दिसत असल्याचा दावा करण्यात येत आहे. या व्हिडिओंची स्वतंत्र पडताळणी अद्याप झालेली नसली, तरी हे व्यक्ती नेमके कोण होते, त्यांनी कोणाच्या आदेशावर कारवाई केली आणि त्यांच्याकडे अधिकृत ओळख का नव्हती, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

कायदेतज्ज्ञ आणि नागरी हक्क कार्यकर्त्यांचे मत आहे की, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची असली तरी प्रत्येक आंदोलनकर्त्याला केवळ 'जमाव' म्हणून पाहणे योग्य नाही. हिंसाचार करणाऱ्या व्यक्तींवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असून, संपूर्ण आंदोलनावर सामूहिक बळाचा वापर हा लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत आहे का, याचीही निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## राजीनामा की रस्त्यावरील संघर्ष? सरकारला २४ तासांचा अल्टिमेटम; दिल्लीत आंदोलन आणखी तीव्र होण्याची चिन्हे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी** नीट पेपरफुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरप्रकारांवरून सुरू असलेल्या दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाने आता अधिक तीव्र वळण घेतले आहे. जंतर-मंतरवरील आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या कॉकरोच जनता पार्टी (उगझ) ने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका कायम ठेवत केंद्र सरकारला २४ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसनेही देशभरात सत्याग्रह, कँडल मार्च आणि आंदोलनांची घोषणा केली असून राजधानीतील राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

गेल्या २६ दिवसांपासून उपोषणावर असलेले सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर आंदोलन संपुष्टात येईल, अशी चर्चा होती. मात्र उगझ ने आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला.

शुक्रवारी दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लब येथे केंद्रीय मंत्री जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंह यांची उगझ चे प्रवक्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांच्यासोबत जवळपास दोन तास बैठक झाली. बैठकीत तीनपैकी दोन मागण्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका दर्शविल्याचे सांगितले जात असले, तरी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर कोणतीही तडजोड होणार नाही, अशी स्पष्ट भूमिका उगझ ने घेतली आहे. या मुद्द्यावर सरकारने शनिवारी दुपारपर्यंतचा वेळ मागितल्याचेही सांगण्यात आले.

दरम्यान, काँग्रेसनेही या आंदोलनात उडी घेतली आहे. नीट पेपरफुटी प्रकरण आणि आंदोलक विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईच्या निषेधार्थ देशभरातील जिल्हाध्यक्षांना कँडल मार्च आणि सत्याग्रह आंदोलन आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

याचवेळी दिल्ली उच्च न्यायालयाने जंतर-मंतर परिसरातील सुमारे १.५ किलोमीटर परिसरातील इंटरनेट सेवा बंद करण्याच्या निर्णयाविरोधातील याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सहमती दर्शविली आहे. तसेच शेकडो वकिलांनी भारताचे सरन्यायाधीश यांना पत्र पाठवून आंदोलन आणि त्यानंतरच्या घडामोडींमध्ये न्यायालयाने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे.

राजधानीत शनिवार-रविवार सुट्टी असल्याने आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने विद्यार्थी जमण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी जामिया मिलिया इस्लामिया आणि दिल्ली विद्यापीठातील २५ हून अधिक विद्यार्थ्यांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, या आंदोलनाला वेगळेच वळण देणारी एक गंभीर घटना समोर आली आहे. 'हिंदू रक्षा दल' या नावाने कार्यरत असलेल्या एका संघटनेचे प्रमुख पिंकी चौधरी यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसिद्ध करून २६ जुलै रोजी जंतर-मंतरवर जाऊन आंदोलकांना धडा शिकवण्याची घोषणा केली आहे. या विधानामुळे राजधानीतील कायदा-सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली जात असून, अशा धमक्यांवर प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे लक्ष लागले आहे.

एकीकडे सरकार विद्यार्थी प्रतिनिधींशी संवाद साधत असल्याचा दावा करत आहे, तर दुसरीकडे आंदोलनाचा विस्तार, विरोधी पक्षांचा वाढता पाठिंबा आणि उघडपणे दिल्या जाणाऱ्या धमक्या यामुळे दिल्लीतील परिस्थिती अधिक संवेदनशील बनली आहे.

आता सर्वांचे लक्ष सरकारच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत सरकार काय भूमिका घेते, त्यावरच आंदोलनाची पुढील दिशा आणि राजधानीतील राजकीय संघर्षाची तीव्रता अवलंबून राहणार आहे.

## संपादकीय

### ढासळती शिक्षण व्यवस्था आणि तरुण भारताची वेदना

भारतातील शिक्षण व्यवस्था आज एका गंभीर वळणावर उभी आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी थेट संबंधित असलेल्या परीक्षा, प्रवेशप्रक्रिया आणि उच्च शिक्षणाच्या संधी यांबाबत निर्माण झालेला अविश्वास दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच विद्यार्थ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी रस्त्यावर उतरल्यावर संवादाऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात असेल, तर तो लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा मानावा लागेल.

गेल्या काही वर्षांत देशात अनेक स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्या. राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. लाखो विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्षे केलेली मेहनत काही तासांत व्यर्थ ठरली. परीक्षा रद्द होणे, निकालात गोंधळ, प्रवेश प्रक्रियेत विलंब आणि सतत बदलणारे नियम यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावरही मोठा परिणाम झाला आहे.

शिक्षण हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार मानला जातो. मात्र सार्वजनिक शिक्षणावरील गुंतवणूक अपेक्षित प्रमाणात वाढताना दिसत नाही. अनेक सरकारी शाळा बंद होत आहेत, तर उच्च शिक्षणाचे वाढते खासगीकरण सर्वसामान्य कुटुंबांच्या आवाक्याबाहेर जात आहे. अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक शिक्षणासाठी लाखो रुपयांचा खर्च करावा लागत असल्याने गुणवंत पण आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (छढअ) कार्यपद्धतीवरही सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, पेपरफुटी, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत झाला आहे. परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची कमतरता ही आजची सर्वात मोठी समस्या बनली आहे.

विद्यापीठांच्या स्वायत्ततेबाबतही गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. कुलगुरू नियुक्त्या, अभ्यासक्रमातील हस्तक्षेप आणि शैक्षणिक निर्णयांमध्ये वाढता राजकीय प्रभाव यामुळे उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणि विश्वासार्हता दोन्ही धोक्यात आली आहेत. जागतिक स्तरावर कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधन आणि नवतंत्रज्ञान वेगाने विकसित होत असताना भारतीय शिक्षण व्यवस्थेला त्या गतीने पुढे जाता आलेले नाही.

या सर्व परिस्थितीत विद्यार्थी आंदोलन करतात, प्रश्न विचारतात आणि उत्तरदायित्वाची मागणी करतात, तेव्हा त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी पोलिसी कारवाईचा अवलंब केला जातो, अशी टीका होत आहे. लोकशाही व्यवस्थेत मतभेद व्यक्त करणे हा घटनात्मक अधिकार आहे. विद्यार्थ्यांचा आवाज ऐकून घेणे ही कोणत्याही जबाबदार सरकारची प्राथमिक जबाबदारी असली पाहिजे.

आजचा विद्यार्थी केवळ पदवीसाठी संघर्ष करत नाही; तो रोजगार, गुणवत्ता, पारदर्शकता आणि सुरक्षित भविष्य यासाठी लढत आहे. वाढती बेरोजगारी, महागडे शिक्षण आणि स्पर्धेचे प्रचंड दडपण यामुळे तरुण पिढी अभूतपूर्व मानसिक तणावाचा सामना करत आहे. अशा वेळी शासनाने विश्वास निर्माण करणारे निर्णय घेणे, परीक्षा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा करणे आणि सार्वजनिक शिक्षणाला बळकटी देणे अत्यावश्यक आहे.

देशाच्या भविष्यासाठी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना संशय, भीती आणि असुरक्षिततेऐवजी गुणवत्तापूर्ण शिक्षण, न्याय्य संधी आणि उत्तरदायी व्यवस्था मिळाली, तरच भारताची युवा शक्ती देशाच्या विकासाची खरी ताकद ठरेल. अन्यथा शिक्षण व्यवस्थेतील ढासळलेला पाया आणि तरुणांच्या वाढत्या असंतोषाची किंमत संपूर्ण देशाला मोजावी लागू शकते.

# सार्वजनिक स्वच्छतागृहांसाठी स्वतंत्र धोरण; नागरिकांच्या सहभागातून पीसीएमसीचा पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

शहरातील सार्वजनिक आणि सामुदायिक स्वच्छतागृह अधिक स्वच्छ, सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने स्वतंत्र सार्वजनिक स्वच्छतागृह धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या धोरणात नागरिकांच्या सूचना आणि प्रत्यक्ष अनुभवांचा समावेश करण्यासाठी निगडी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींसोबत केंद्रित गटचर्चा आयोजित करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक व सामुदायिक स्वच्छतागृहांसाठी स्वतंत्र धोरणाचा मसुदा तयार केला जात असून, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभाग ही प्रक्रिया राबवत आहे. नागरिकांच्या अपेक्षा आणि सूचना लक्षात घेऊन धोरण अधिक प्रभावी व नागरिकाभिमुख करण्यावर महापालिकेचा भर आहे.



या चर्चासत्रात ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, निवासी कल्याण संघटनांचे (RWA) प्रतिनिधी, तृतीयपंथी समाजाचे प्रतिनिधी तसेच विविध सामाजिक संस्थांच्या सदस्यांनी सहभाग घेतला. सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता, सुरक्षितता, देखभाल, सुविधा आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी विविध सूचना मांडण्यात आल्या.

दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी वापरण्यास सोयीस्कर रचना, तृतीयपंथी नागरिकांसाठी सन्मानपूर्वक सुविधा, नियमित स्वच्छता, अखंड पाणीपुरवठा, पुरेशी प्रकाशयोजना, सुरक्षित वातावरण, वेळेवर दुरुस्ती आणि प्रभावी देखभाल यावर विशेष भर देण्यात आला. तसेच सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या व्यवस्थापनात नागरिकांचा अधिक सहभाग वाढविण्याबाबतही सूचना नोंदविण्यात आल्या.

उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, आरोग्य विभागामार्फत सार्वजनिक आणि सामुदायिक स्वच्छतागृहांसाठी स्वतंत्र धोरण तयार करण्यात येत आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तृतीयपंथी नागरिक आणि निवासी संघटनांकडून मिळणाऱ्या सूचना या धोरणाला अधिक सर्वसमावेशक आणि नागरिकाभिमुख बनविण्यास उपयुक्त ठरतील.

गटचर्चेत प्राप्त झालेल्या सूचना आणि शिफारशींचा अंतिम धोरणामध्ये समावेश करण्यात येणार असून, त्याद्वारे शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृह सेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि परिणामकारक करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

या बैठकीस उप आयुक्त अतुल पाटील, सहायक आयुक्त दशरथ कांबळे, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजू साबळे, सुधीर वाघमारे, महेश आढाव, शांताराम माने, राजेश भाट, अंकुश झिटे, अतुल सोनवणे, उपअभियंता वंदना मोरे, अभिजित गनबोटे, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तन्मय गौंड यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी मानले.

नागरिकांच्या सक्रिय सहभागातून तयार होणारे हे धोरण सार्वजनिक स्वच्छतागृह व्यवस्थापन अधिक सक्षम, शाश्वत आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याचा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला.

## पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी महापौर रवि लांडगे यांचा दिल्ली दौरा; रेड झोन, महामार्गांसह विविध प्रकल्पांवर केंद्राशी चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली / पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापौर रवि लांडगे यांनी दिल्ली दौऱ्यात विविध केंद्रीय मंत्र्यांची भेट घेऊन शहरातील प्रलंबित प्रश्न, पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा केली. शहराला केंद्र सरकारच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा तसेच प्रलंबित विकासकामांना गती मिळावी, या उद्देशाने त्यांनी विकासाचा व्यापक आराखडा केंद्र सरकारसमोर मांडला.

महापौर लांडगे यांनी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन पिंपरी-चिंचवडमधील रेड झोनचा प्रश्न उपस्थित केला. संरक्षण विभागाच्या निर्बंधांमुळे बांधकाम परवानग्या, पुनर्विकास, मालमत्ता व्यवहार, बँक कर्जे आणि विविध विकासकामांमध्ये नागरिकांना येणाऱ्या अडचणींची माहिती त्यांनी दिली. या प्रश्नावर संरक्षण मंत्रालय,



महाराष्ट्र शासन, संरक्षण प्राधिकरण आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त बैठकीद्वारे कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली. तसेच केंद्रीय संरक्षणमंत्र्यांना प्रत्यक्ष पिंपरी-चिंचवडला भेट देण्याचे निमंत्रणही देण्यात आले.

त्यानंतर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग (एनएच-६०) आठपदरीकरणासाठी प्रलंबित भूमी संपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची आणि प्रकल्पाला गती देण्याची मागणी करण्यात आली. तसेच भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्यास कायम ठेवण्याची तसेच मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला लवकरात लवकर सुरुवात करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, औद्योगिक आणि व्यापारी विकासाला चालना मिळण्यास तसेच नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात मोठी सुधारणा होण्यास मदत होईल, असा विश्वास महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केला.

महापालिकेच्या माहितीनुसार, दिल्ली दौऱ्यात शहराशी संबंधित विविध विकास प्रकल्पांवर सकारात्मक चर्चा झाली असून आगामी काळात केंद्र सरकारच्या सहकार्याने या प्रकल्पांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या आंबेगाव तालुकाध्यक्षपदी सुनील शिंदे; रोहिणी आयोगाची अंमलबजावणी करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या आंबेगाव तालुकाध्यक्षपदी सुनील आनंदा शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पुणे जिल्हाध्यक्ष अशोक नारायण मगर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली. यावेळी बोलताना अशोक मगर यांनी इतर मागासवर्गीय समाजातील वंचित घटकांना न्याय मिळण्यासाठी रोहिणी आयोगाच्या शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली. तसेच खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी पुणे व पिंपरी-चिंचवडमधील नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊन शासनाच्या विविध शैक्षणिक योजना व सवलतींचा लाभ घ्यावा, असे



आवाहनही त्यांनी केले. नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष सुनील शिंदे यांना सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असून त्यांनी नागापूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच तसेच सरपंच म्हणूनही काम केले आहे. कार्यक्रमाची सुरुवात संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. उपस्थितांचे स्वागत आंबेगाव तालुक्याचे माजी अध्यक्ष सचिन देवडे यांनी केले. यावेळी पुणे जिल्हा महिला अध्यक्षा अनिता मगर, पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सोमनाथ शिंदे, पुणे जिल्हा संघटक संतोष गोरे, पिंपरी-चिंचवड महिला शहराध्यक्षा रुपाली गोरे, महिला कोषाध्यक्षा वनिता कारेकर, खेड तालुका महिला अध्यक्षा कविता वाळुंज तसेच आंबेगाव तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आषाढी एकादशीनिमित्त शिरूरमधील शाळांमध्ये भक्तिमय दिंडी सोहळे; वारकरी संस्कृतीचा विद्यार्थ्यांना परिचय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त शिरूर शहरातील विविध शाळांमध्ये भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले. वारकरी वेशभूषा, टाळ-मृदुंगाचा गजर, विठ्ठलनामाचा जयघोष, अभंग, रिंगण सोहळे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, भारतीय संस्कृती आणि सामाजिक मूल्यांचा परिचय करून देण्यात आला.

आर. एम. धारीवाल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नर्सरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषेत दिंडी काढली. विद्यार्थ्यांच्या हातात भगवे ध्वज, टाळ-मृदुंगाच्या गजरात ज्ञानबा-तुकारामचा जयघोष आणि विठ्ठलनामाच्या गजराने परिसर भक्तिमय झाला. यावेळी रिंगण सोहळा, श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे स्वागत आणि महाआरतीनंतर विद्यार्थ्यांनी अभंग, भक्तिमय नृत्य, फुगडी तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्री-प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची आकर्षक प्रतिकृती उभारून वारकरी संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, संत परंपरा, भक्तीभाव, सामूहिकता आणि सामाजिक मूल्यांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आषाढी एकादशीचा सोहळा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

## पार्थ पवारांचा विवाह २७ फेब्रुवारी २०२७ रोजी; २९ जुलैला होणार साखरपुडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते पार्थ पवार आणि कायनात दारा यांचा विवाह निश्चित झाला असून, २९ जुलै २०२६ रोजी साखरपुडा तर २७ फेब्रुवारी २०२७ रोजी बारामती येथे विवाहसोहळा पार पडणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उमेश पाटील यांनी दिली.

उमेश पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, विवाहाच्या तारखा निश्चित करण्यात आल्या असून, साखरपुडा २९ जुलैला होणार आहे. तर मुख्य विवाहसोहळा २७ फेब्रुवारी २०२७ रोजी बारामती येथे आयोजित करण्यात येणार आहे.

पार्थ पवार यांच्या विवाहासंदर्भात उपस्थित झालेल्या काही धार्मिक शंकांबाबत शंकराचार्यांशी चर्चा करण्यात आली होती. या चर्चेनंतर संबंधित शंकांचे निरसन झाल्याचेही उमेश पाटील यांनी सांगितले.

पार्थ पवार यांच्या विवाहाची अधिकृत घोषणा झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, बारामतीत होणाऱ्या विवाहसोहळ्याकडे राजकीय आणि सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाचा प्रस्ताव तात्काळ रद्द करा; अनु.जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या घटनात्मक आरक्षणाचे प्रस्तावित उपवर्गीकरण

तात्काळ रद्द करण्यात यावे, या ठाम मागणीसाठी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या ५९ जातींच्या वतीने शुक्रवार दि २४ जुलै २०२६ रोजी निगडी येथील भक्ती शक्ती शिल्प ते अप्पर तहसिल कार्यालय पिंपरी चिंचवड पर्यंत महामोर्चाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यावेळी महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री यांच्या नावे अप्पर तहसीलदार, यांच्या मार्फत सविस्तर निवेदन सादर करण्यात येईल.

संघर्ष समितीच्या निवेदनात, अनुसूचित जातींना मिळालेले आरक्षण हे कोणत्याही शासनाची कृपा नसून भारतीय संविधानाने दिलेला घटनात्मक हक्क आहे. शतकानुशतके अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, आर्थिक शोषण आणि शैक्षणिक व राजकीय वंचना सहन केलेल्या समाजाला सामाजिक न्याय मिळावा, समान संधी उपलब्ध व्हाव्यात आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त व्हावा या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्ये आरक्षणाची तरतूद केली. त्यामुळे या घटनात्मक आरक्षणाचे कोणत्याही .

प्रकारचे उपवर्गीकरण करणे म्हणजे संविधानाच्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वालाच धक्का देणारे पाऊल आहे असे स्पष्ट नमूद केले जाणार आहे.

समितीने म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी सुरू केलेली प्रक्रिया राज्यातील लाखो अनुसूचित जाती समाजामध्ये तीव्र अस्वस्थता आणि संताप निर्माण करणारी आहे. अशा प्रकारचा निर्णय समाजात भेद निर्माण करून सामाजिक सलोखा बिघडवू शकतो. शासनाने समाजामध्ये फूट पाडणारे निर्णय घेण्याऐवजी अनुसूचित जातींच्या विद्यमान घटनात्मक हक्कांचे संरक्षण करण्यावर भर द्यावा, अशी मागणी करण्यात येईल.

निवेदनात शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल की, आजही शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, विद्यापीठे आणि सार्वजनिक क्षेत्रातील हजारो आरक्षित पदे रिक्त आहेत. अनेक ठिकाणी डी-रिझर्व्हेशनच्या माध्यमातून आरक्षणाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. रोस्टर प्रणालीतील त्रुटी, अनुशेष, अपुरी भरती, शिक्षण व शिष्यवृत्तीतील अडचणी यांसारखे मूलभूत प्रश्न कायम असताना शासनाने उपवर्गीकरणाचा विषय पुढे आणणे हे सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत असल्याचे समिती नमूद करेल.

संघर्ष समितीने स्पष्ट केले की, अनुसूचित जाती समाज हा संविधानावर आणि लोकशाहीवर पूर्ण विश्वास ठेवणारा समाज आहे. त्यामुळे सध्या लोकशाही व घटनात्मक मार्गाने शासनाकडे न्याय मागितला जात आहे. मात्र राज्य शासनाने या मागणीची दखल घेतली नाही, उपवर्गीकरणाचा प्रस्ताव मागे घेतला नाही किंवा समाजाच्या घटनात्मक हक्कांवर आघात करण्याचा प्रयत्न सुरूच ठेवल्याने राज्यभर व्यापक जनजागृती, निदर्शने, धरणे, मोर्चे आणि तीव्र लोकशाही जनआंदोलन उभारली जात आहेत. त्याचाच भाग २४ जुलै ला होणारा मोर्चा आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र शासनाची राहील, असा स्पष्ट इशारा समितीने दिला आहे.

## "तू खबरी आहेस" म्हणत तरुणाला लोखंडी रॉडने बेदम मारहाण!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सांगवी :** सांगवी परिसरातील अहिल्याबाई वोळकर घाटाजवळ दारू पिऊन बसलेल्या चार जणांनी एका तरुणावर प्राणघातक हल्ला केला.

आरोपी: यश बडे, अमित चलवादि, राहुल चव्हाण आणि अक्षय मोरे (सर्व रा. जुनी सांगवी). घटना: फिर्यादी विजय सातपुते (वय ५१) घाटावर बसलेले असताना, आरोपींनी "तू पोलिसांना आमची खबर देतोस" असा संशय घेऊन त्यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला केला. फिर्यादीच्या उजव्या हाताचे मनगट फ्रॅक्चर झाले असून डोक्यावर आणि पाठीवर गंभीर दुखापत झाली आहे. तपास अधिकारी: श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जगताप (९७६४००५३९५) पोलीस इशारा: अनोळखी व्यक्तींच्या सांगण्यावरून बँक खाती उघडून देणे किंवा स्वतःचे खाते भाड्याने देणे हा गंभीर गुन्हा आहे. अशा व्यवहारात गुंतलेल्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.


## बीएलओ कामाच्या सक्तीविरोधात आशा सेविकांचे महापालिकेसमोर आंदोलन; कारवाई होणार नसल्याचे प्रशासनाचे आश्वासन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

सहाय्यक बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर)चे काम सक्तीने लादू नये, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशा कर्मचारी संघाच्या वतीने शुक्रवारी पिंपरी-चिंचवड महापालिका मुख्यालयासमोर शेकडो आशा सेविकांनी भर पावसात आंदोलन केले. आंदोलनानंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त उपआयुक्त कुलदीप जंगम यांना निवेदन सादर केले.

बैठकीदरम्यान अतिरिक्त उपआयुक्त कुलदीप जंगम यांनी सहाय्यक बीएलओचे काम आशा सेविकांवर जबरदस्तीने लादले जाणार नाही तसेच हे काम नाकारणाऱ्या कोणत्याही आशा सेविकेवर कारवाई केली जाणार नाही, असे आश्वासन दिले.



यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेत आशा सेविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच या कामासाठी आशा सेविकांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत प्रस्ताव तयार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. याशिवाय, कार्यमुक्त करण्यात आलेल्या आशा सेविकांना पुन्हा नियमित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आंदोलनकर्त्यांच्या वतीने आरोग्य सेवेसोबतच अतिरिक्त निवडणूक कामाचा वाढता ताण लक्षात घेता बीएलओची जबाबदारी सक्तीने देऊ नये, अशी भूमिका मांडण्यात आली. आशा सेविकांचे मूळ आरोग्यविषयक काम प्रभावित होणार नाही, याची खबरदारी घेण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान संघटनेने दिल्लीतील विद्यार्थी आंदोलन तसेच राज्यातील स्मार्ट मीटरविरोधी आंदोलनालाही पाठिंबा जाहीर केला. यावेळी महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशा कर्मचारी संघाचे राज्य उपाध्यक्ष कॉ. निलेश दातखिळे, पालिका संघाच्या अध्यक्षा चंद्रा कांबळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि शेकडो आशा सेविका उपस्थित होत्या.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### भारतातील ४ कोटी मुले लठ्ठपणाच्या विळख्यात, शाळांमध्ये जंकफूडवर कठोर निर्बंधांची शिफारस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : भारतातील ५ ते १८ वर्षे वयोगटातील सुमारे ४ कोटी मुले जास्त वजन-लठ्ठपणाने ग्रस्त असून, सध्याची स्थिती कायम राहिल्यास २०३० पर्यंत जगातील लहान मुलांच्या लठ्ठपणाच्या एकूण प्रमाणात भारताचा वाटा ११ टक्क्यांहून अधिक असेल, असा इशारा 'लेट्स फिक्स अवर फूड' या धोरणपत्रिकेत (पॉलिसी डॉक्युमेंट) देण्यात आला आहे. मुलांमध्ये वाढत असलेल्या लठ्ठपणा, मधुमेह आणि इतर असंसर्गजन्य आजारांना आळा घालण्यासाठी शाळांमध्ये जंकफूडच्या विक्री आणि जाहिरातींवर कठोर निर्बंध घालण्यासह अनेक उपाययोजनांची शिफारस करण्यात आली आहे.

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) – नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशन यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आलेल्या या धोरणपत्रिकेनुसार, भारतात १० कोटींहून अधिक प्रौढ मधुमेह, ३१ कोटी उच्च रक्तदाब आणि २५ कोटी स्थुलतेने ग्रस्त आहेत. त्याच बरोबर मुलांमध्येही जंकफूड, जास्त साखर, मीठ आणि चरबीयुक्त पदार्थांचे वाढते सेवन चिंताजनक ठरत आहे.

धोरणपत्रिकेनुसार, देशातील सुमारे १० लाख शाळांमध्ये २४.७ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत असून, एक विद्यार्थी १० ते १२ वर्षांच्या कालावधीत सुमारे १२ हजार तास शाळेत घालवतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी आहाराच्या सवयी विकसित करण्यासाठी शाळा हे सर्वात प्रभावी व्यासपीठ असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मुलांना लक्ष्य करून करण्यात येणाऱ्या जंकफूडच्या जाहिरातींवर कायदेशीर निर्बंध आणणे, डिजिटल माध्यमांवरील प्रभावी नियंत्रण आणि 'एचएफएसएस' अन्नपदार्थांची स्पष्ट कायदेशीर व्याख्या करण्याचीही आवश्यकता धोरणपत्रिकेत अधोरेखित करण्यात आली आहे.

# संततधार पावसाचा तरकारी पिकांना फटका; शेतकरी संकटात, उत्पादनासह दरांचाही दुहेरी मार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यासह पूर्व भागात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे भाजीपाला व तरकारी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अनेक ठिकाणी शेतांमध्ये पाणी साचून तळ्याचे स्वरूप निर्माण झाल्याने पिकांची तोडणी, वाहतूक आणि बाजारपेठेत माल पोहोचवणे अत्यंत कठीण झाले आहे.

सध्या लोणी, धामणी, पारगाव, पोंदेवाडी, जारकरवाडी, मेंगडेवाडी, निरगुडसर आदी परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर टोमॅटो, फ्लॉवर, कांदापात तसेच विविध तरकारी पिकांची लागवड केली आहे. मात्र, सततच्या पावसामुळे ही पिके पाण्यात बुडाल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यंदा फ्लॉवरचे पीक चांगल्या जोमात येऊन तोडणीच्या अवस्थेत असतानाच पावसाने घात केला आहे. शेतात पाणी साचल्यामुळे बुरशीजन्य व इतर रोगांचा प्रादुर्भाव वाढत असून त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी औषध फवारणीचा खर्चही वाढला आहे. त्यामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

एकीकडे नैसर्गिक संकट तर दुसरीकडे बाजारातील दरातील चढ-उतार आणि मजुरांची टंचाई यामुळे शेतकरी दुहेरी संकटाचा सामना करत आहे. शेतातून



माल बाहेर काढण्यासाठीही अडचणी निर्माण झाल्याने अनेक ठिकाणी भाजीपाला शेतातच खराब होण्याची भीती आहे.

मेंगडेवाडी येथील फ्लॉवर उत्पादक शेतकरी हनुमान टाव्हरे यांनी सांगितले की, सततच्या पावसामुळे फ्लॉवर पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे औषध फवारणी आणि देखभालीचा खर्च वाढत आहे. मात्र, उत्पादन खर्चाच्या तुलनेत बाजारभाव मिळत नसल्याने मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

सध्या बाजारात दहा किलो फ्लॉवरला केवळ १५० ते १८० रुपये दर मिळत असल्याने फ्लॉवर उत्पादक शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नैसर्गिक आपत्ती आणि घसरलेले बाजारभाव यामुळे शेतकरी अडचणीत सापडला असून नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त लोणीत भव्य रक्तदान शिबिर; १४१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या संयुक्त विद्यमाने लोणी (ता. आंबेगाव) येथील महादेव मंदिरात आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण १४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

हे रक्तदान शिबिर सर्व वीर बजरंगींचे प्रेरणास्थान धर्मवीर चंद्रशेखर अण्णा बाणखेले यांच्या १५ व्या पुण्यस्मरणदिनानिमित्त आयोजित करण्यात आले होते. महादेव मंदिर येथे गेल्या सात वर्षांपासून सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत



असून, यंदाही मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी सहभाग नोंदविला.

या शिबिरासाठी पुणे ब्लड बँकेचे संतोष साठे व त्यांच्या संपूर्ण टीमचे मोलाचे सहकार्य लाभले. हिंदू धर्मरक्षक अमोल ढगे पाटील तसेच भाजप पूर्व मंडळाचे अध्यक्ष किरणभाऊ वाळुंज पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अनेक वीर बजरंगी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. आयोजकांनी रक्तदान करणाऱ्या सर्व १४१ रक्तदात्यांचे, सहकार्य करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांचे तसेच पुणे ब्लड बँकेच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. त्यांच्या या योगदानामुळे अनेक गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होऊन जीवदान मिळणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली.

## साडेतीन कोटींचा रस्ता सात महिन्यांतच उखडला

### तळेघर–निगडाळे मार्गावरील निकृष्ट कामाचा संताप, आंदोलनाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी



आंबेगाव तालुक्यातील तळेघर ते निगडाळे या भीमाशंकर राष्ट्रीय महामार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या ८ किलोमीटर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्च करण्यात आले. मात्र अवघ्या सात महिन्यांतच या रस्त्यावरील डांबरीकरण उखडून ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने प्रशासनाच्या देखरेखीवर आणि कंत्राटदाराच्या कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या मते, रस्त्याचे काम सुरू असतानाच कंत्राटदाराकडून निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याच्या तक्रारी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आल्या होत्या. हलक्या दर्जाचे डांबर आणि खडी वापरली जात असल्याचे निदर्शनास आणून देऊनही अधिकाऱ्यांनी या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

काम सुरू असतानाच आम्ही हा रस्ता निकृष्ट दर्जाचा होत असल्याचे वारंवार सांगत होतो. मात्र प्रशासनाने कंत्राटदाराला पाठिशी घातले. आता त्याची शिक्षा सर्वसामान्य नागरिक आणि आदिवासी बांधवांना भोगावी लागत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकरकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील हा महत्त्वाचा टप्पा असल्याने पावसाळ्यात या मार्गावर भाविक आणि पर्यटकांची मोठी वर्दळ असते. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून वाहनांचेही मोठे नुकसान होत असल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे.

दरम्यान, निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदाराला तातडीने काळ्या यादीत टाकावे, कामाचा दर्जा तपासल्याशिवाय बिल मंजूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि कंत्राटदाराच्या खर्चातूनच संपूर्ण रस्ता पुन्हा उच्च दर्जाने बांधून घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थ आणि किसान सभेने केली आहे.

पवित्र भीमाशंकर देवस्थानाकडे जाणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गाची झालेली दुरवस्था भाविकांमध्येही तीव्र नाराजी निर्माण करत आहे. प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा किसान सभेने दिला आहे.


## दोन गुंठ्यांत रेशीम उद्योगाची यशोगाथा; जारकरवाडीच्या युवकाची दर ४५ दिवसांत ८० हजारांची कमाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी येथील युवकाने आधुनिक शेतीपूरक व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबनाचा आदर्श निर्माण केला आहे. अवघ्या दोन गुंठे जागेत रेशीम उद्योग उभारून अविनाश बाळू लबडे यांनी दर ४५ दिवसांनी सुमारे ८० हजार रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळवण्याची किमया साधली असून, ग्रामीण भागातील युवकांसाठी ते प्रेरणादायी ठरत आहेत.

आजच्या घडीला शेतीतील वाढता उत्पादन खर्च, हवामानातील अनिश्चितता आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे अनेक युवक शहरांकडे धाव घेत आहेत. मात्र, अविनाश लबडे यांनी नोकरीच्या मागे न लागता शेतीपूरक व्यवसायाची वाट निवडली आणि त्यातून यशस्वी उद्योजक म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण




केली.

अविनाश लबडे यांनी सांगितले की, रेशीम उद्योगातील एक बॅच पूर्ण होण्यासाठी साधारण ४५ दिवस लागतात. या कालावधीनंतर सर्व खर्च वजा जाता सुमारे ८० हजार रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळते. कमी गुंतवणुकीत आणि कमी क्षेत्रात अधिक आर्थिक परतावा मिळत असल्याने भविष्यात हा व्यवसाय आणखी विस्तारण्याचा त्यांचा मानस आहे.

सध्या बाजारात रेशीम कोषाला प्रति किलो ७०० ते ८०० रुपये दर मिळत असून, त्यामुळे या व्यवसायाला चांगली मागणी आहे. कमी क्षेत्रात अधिक उत्पन्न देणारा रेशीम उद्योग हा पारंपरिक शेतीला पूरक ठरत असून अनेक शेतकरी आणि ग्रामीण युवकांसाठी उत्पन्नाचे प्रभावी साधन बनत आहे.

अविनाश लबडे यांनी ग्रामीण युवकांना संदेश देताना सांगितले की, केवळ नोकरीच्या शोधात वेळ घालवण्यापेक्षा आधुनिक शेतीपूरक उद्योग-व्यवसाय स्वीकारल्यास आर्थिक स्वावलंबन साधता येते. स्वतःचा उद्योग उभारल्यास स्वतः बरोबरच इतरांनाही रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

जारकरवाडीतील हा प्रयोग ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून, योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान आणि मेहनतीच्या बळावर अल्प क्षेत्रातही मोठे आर्थिक यश मिळवता येते, हे अविनाश लबडे यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

## धावडी–फलकेवाडी जिल्हा परिषद शाळेची आषाढी एकादशीनिमित्त उत्साहात बालदिंडी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

आषाढी एकादशीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धावडी व फलकेवाडीच्या वतीने पारंपरिक वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविणारी बालदिंडी उत्साहपूर्ण वातावरणात काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत सहभागी होत संपूर्ण परिसर भक्तिमय केला.

या निमित्ताने सर्व विद्यार्थी पारंपरिक पोशाखात शाळेत दाखल झाले. मुलांनी पायजमा-सदरा, तर मुलींनी नऊवारी साडी परिधान केली होती. प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात भगवा ध्वज होता. काही विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पालखीत ज्ञानेश्वरी ग्रंथासह श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती आणि तसबीर ठेवण्यात आली होती. गावातील भजन मंडळांनीही या दिंडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. मृदंग, टाळ आणि अभंगांच्या गजरात ज्ञानबा-तुकारामच्या जयघोषाने दिंडीने श्री गणेश मंदिर, श्रीराम मंदिर मार्गे संपूर्ण फलकेवाडी गावाला प्रदक्षिणा घालून पुन्हा शाळेत आगमन केले. श्री गणेश मंदिरात भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आरतीनंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी विद्यार्थ्यांना चिक्की, बिस्किटे, लाडू आदी प्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात ह.भ.प. चंद्रकांत फलके, नवनाथ फलके, वसंत फलके, गोविंद कुरणे, भानुदास फलके, भिकाजी काथेर, मारुती फलके, सौ. संगीता फलके, खरात मॅडम, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. सुनिता फलके, सौ. वैशाली थोरात, विकास थोरात, राजाराम काथेर यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि वारकरी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## मंचर एसटी बसस्थानक खड्ड्यांच्या विळख्यात; पावसाचे पाणी साचल्याने प्रवाशांची गैरसोय, तातडीच्या दुरुस्तीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

मंचर एसटी बसस्थानकाच्या आवारात पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी जाणारे हजारो भाविक या बसस्थानकाचा वापर करत असल्याने स्थानकाच्या दुरवस्थेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

> **खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका**
>
> **बसस्थानकाच्या आवारात पावसाचे पाणी साचल्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने प्रवासी घसरून पडण्याची भीती व्यक्त होत आहे. तसेच वारंवार बसला बसणाऱ्या धक्क्यांमुळे एसटी वाहनांचेही नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ तात्पुरती डागडुजी न करता दर्जेदार आणि टिकाऊ दुरुस्ती करण्याची गरज असल्याचे प्रवाशांचे मत आहे.**

मंचर एसटी बसस्थानकावर दिवसभर स्थानिक तसेच लांब पल्ल्याच्या बसची मोठी वर्दळ असते. मात्र सततच्या पावसामुळे स्थानकाच्या आवारात अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून त्यात पावसाचे पाणी साचत आहे. त्यामुळे बसमध्ये चढताना आणि उतरताना प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. बसस्थानकात प्रवेश करताना आणि बाहेर पडताना खड्ड्यांमुळे एसटी बसला वारंवार धक्के बसत असून त्याचा परिणाम प्रवाशांच्या सुरक्षिततेवरही होत आहे.

ज्येष्ठ नागरिक, महिला, आजारी प्रवासी तसेच लहान मुलांसह प्रवास करणाऱ्यांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे. विशेष म्हणजे, बसस्थानकाच्या आवारातील खड्डे बुजविण्यासाठी यापूर्वी निधी मंजूर होऊन दुरुस्तीचे काम करण्यात आले होते. मात्र ते काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप प्रवाशांकडून केला जात आहे. त्यामुळे अल्पावधीतच रस्ता पुन्हा उखडला असून खड्ड्यांचे प्रमाण वाढले आहे. प्रवाशांनी संबंधित विभागाने तातडीने खड्डे बुजवून बसस्थानकाचा परिसर सुरक्षित, सुस्थितीत आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर करावा, अशी मागणी केली आहे.

## गटारींच्या दुर्लक्षामुळे पांचाळेजवळ रस्त्यावर झाडे कोसळली; वाहतूक ठप्प, सभापती कैलासबुवा काळे यांनी रस्ता केला मोकळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील पांचाळे गावाजवळ रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारींची वेळेवर स्वच्छता न केल्याने आणि पाण्याचा योग्य निचरा न झाल्यामुळे मुख्य रस्त्यालगतची दोन झाडे अचानक कोसळून वाहतूक पूर्णपणे ठप्प झाल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच सभापती कैलासबुवा काळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत प्रशासन आणि ग्रामस्थांच्या मदतीने रस्त्यावर पडलेली झाडे हटवून वाहतूक सुरळीत केली.



आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. मात्र रस्त्यालगतच्या गटारींची नियमित स्वच्छता व देखभाल न झाल्याने पावसाचे पाणी साचून राहिले. त्यामुळे रस्त्याच्या कडेला असलेली माती खचली आणि मुळांचा आधार सुटल्याने एक मोठे व एक लहान झाड थेट मुख्य रस्त्यावर कोसळले.

झाडे रस्त्याच्या मध्यभागी पडल्यामुळे दोन्ही बाजूंनी वाहतूक पूर्णपणे बंद झाली. अनेक वाहनधारक आणि प्रवासी अडकून पडले. तसेच परिसरातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वेळेवर जेवणाचा पुरवठा करता न आल्याने अडचणी निर्माण झाल्या.

या घटनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. गटारींची योग्य दुरुस्ती आणि नियमित साफसफाई न केल्यानेच पाणी तुंबून ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पावसाळ्यापूर्वी गटारींची स्वच्छता करणे आवश्यक असतानाही संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्याने हा प्रकार घडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने या घटनेची गंभीर दखल घेऊन आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील सर्व रस्त्यांलगतच्या गटारींची तातडीने दुरुस्ती करावी, पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होईल अशी व्यवस्था उभी करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी आदिवासी बांधव व स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## सारांश वृत्त

### ग्रामपंचायत निवडणूक: २४ जुलै रोजी प्रसिद्ध होणारी प्रारूप मतदार यादी तूर्तास स्थगित; राज्य निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबइ । प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकांबाबत एक अत्यंत महत्वाचा निर्णय घेतला आहे. २४ जुलै रोजी प्रसिद्ध होणारी ग्रामपंचायत निवडणुकीची प्रारूप मतदार यादी तूर्तास स्थगित करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोगाकडून या मतदार याद्यांची प्रक्रिया पुढील आदेशापर्यंत थांबवण्यात आली आहे. या निवडणुकांसाठीचा नवीन सुधारित कार्यक्रम लवकरच जाहीर केला जाईल, अशी माहिती आयोगाकडून देण्यात आली आहे. मतदार याद्यांच्या घोषणेला स्थगिती मिळाल्यामुळे आता निवडणुकीच्या प्रत्यक्ष तारखांवरही याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.नवीन सुधारित कार्यक्रम कधीपर्यंत जाहीर होईल याबद्दल अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

### आंदोलनात हिंसाचार घडवलेल्यांची खैर नाही... पोलिसांनी सुरू केली उउढ्ढ तपासणी, कारवाईही ठरली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबइ । प्रतिनिधी** नीट पेपरफुटी प्रकरणी विद्यार्थ्यांचा आक्रोश २० जुलैला दिल्लीच्या रस्त्यांवर दिसून आला. कॉकरोच जनता पार्टीने (उगझ) अभिजीत दीपकेच्या नेतृत्वाखाली संसदेवर मोर्चा काढला. या आंदोलनाला मध्येच हिंसक वळण लागले. पोलिस आणि आंदोलक यांच्यात बाचाबाची आणि हाणामारी झाली. या आंदोलनात काही समाजकंटकांनी मुद्दाम घुसून हिंसाचार घडवल्याचा प्रयत्न केल्याचा पोलिसांना आणि तपास यंत्रणांना संशय आहे. त्यामुळे आंदोलनादरम्यान आंदोलकांच्या नावाखाली घुसलेल्या समाजकंटकांवर आता मोठी कारवाई होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्यांचे पासपोर्ट रद्द केले जाऊ शकतात. हिंसाचार घडवून आणणाऱ्या आंदोलकांची ओळख पटवण्यासाठी दिल्ली पोलिसांनी हिंसाचाराशी संबंधित व्हिडिओ आणि सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरु केली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, हिंसाचार घडवून आणणाऱ्या किंवा त्यात थेट सहभागी असलेल्यांवर कारवाई केली जात आहे.

# एआयला दिलासा, एएनआयला धक्का! दिल्ली उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कॉपीराइट कायद्याच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने वृत्तसंस्था एशियन न्यूज इंटरनॅशनल (एएनआय) ला मोठा धक्का दिला आहे. न्यायालयाने ओपनएआय विरुद्ध दाखल करण्यात आलेल्या कॉपीराइट उल्लंघनाच्या खटल्यात अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला आहे.

न्यायमूर्ती अमित बन्सल यांनी दिलेल्या आदेशात म्हटले की, प्रथमदर्शनी उपलब्ध पुराव्यांच्या आधारे एएनआय हे सिद्ध करण्यात अपयशी ठरली की 'चॅटजीपीटी'ने तिच्या कॉपीराइटचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे या टप्प्यावर ओपनएआयच्या कार्यावर कोणतीही अंतरिम बंदी घालण्याचे कारण दिसून येत नाही.

न्यायालयाने आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, मोठ्या भाषा नमुन्यांना (लार्ज लँग्वेज मॉडेल्स) प्रशिक्षण देण्यासाठी एएनआयच्या साहित्याचा वापर प्रथमदर्शनी भारतीय कॉपीराइट कायद्यातील कलम ५२(१)(अ) अंतर्गत असलेल्या वाजवी वापर (फेअर डीलिंग) या अपवादाच्या कक्षेत येऊ शकतो. त्यामुळे या टप्प्यावर तो वापर कॉपीराइट उल्लंघन ठरवता येणार नाही.




या प्रकरणात एएनआयने आरोप केला होता की, तिच्या वृत्तसामग्रीचा वापर परवानगीशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीला प्रशिक्षण देण्यासाठी करण्यात आला. त्यामुळे तिच्या बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन झाले असून, न्यायालयाने ओपनएआयला तत्काळ रोखावे, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र न्यायालयाने अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला.

हा निर्णय केवळ एएनआय आणि ओपनएआयपुरता मर्यादित नसून, भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे, प्रकाशन उद्योग आणि कॉपीराइट कायदा यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. जगभरात कृत्रिम बुद्धिमत्ता कंपन्या इंटरनेटवरील उपलब्ध साहित्याचा वापर करून आपली प्रणाली विकसित करत आहेत. अशा परिस्थितीत लेखक, प्रकाशक आणि वृत्तसंस्था यांच्या बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण आणि तंत्रज्ञान विकास यामधील समतोल कसा साधला जाणार, हा आता केंद्रस्थानी आलेला प्रश्न आहे.

या निर्णयामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता कंपन्यांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी अंतिम कायदेशीर लढाई अद्याप बाकी आहे. न्यायालयाने केवळ अंतरिम टप्प्यावर एएनआयची मागणी फेटाळली असून, खटल्याचा अंतिम निकाल अद्याप लागलेला नाही.

## पोलिसांच्या लाठीचार्जविरोधात दोन याचिका; सर्वोच्च न्यायालयात २७ जुलैला सुनावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

NEET-UG पेपर लीक प्रकरणाविरोधात रस्त्यावर उतरलेल्या आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्ज आणि अत्याचाराच्या विरोधात दाखल झालेल्या दोन वेगवेगळ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय सोमवारी, २७ जुलै रोजी सुनावणी करण्यास तयार झाले आहे.ज्येष्ठ वकील श्याम दिवाण आणि गोपाल शंकरनारायणन यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर हा गंभीर मुद्दा तातडीच्या सुनावणीसाठी उपस्थित केला. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी गेल्या दोन दिवसांत कोर्टाबाबत पसरवल्या जाणाऱ्या चुकीच्या बातम्यांवर नाराजी व्यक्त केली होती. ''गेल्या दोन दिवसांत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्याबाबत पूर्णपणे चुकीची आणि दिशाभूल करणारी विधाने करण्यात आली. आज सकाळी १० वाजेपर्यंत न्यायालयात एकही पान (याचिका) अधिकृतपणे दाखल झालेले नव्हते. न्यायालयात केवळ एक साधे पत्र किंवा निवेदन आले होते. अशा पत्राला मी थेट रिट याचिका कसे मानू शकतो?'', असे सूर्यकांत म्हणाले होते. शुक्रवारच्या कामकाजादरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने याचिकांना नंबर दिल्याची माहिती वकील गोपाल शंकरनारायणन यांनी दिली. २० जुलै रोजी दिल्लीत निघालेल्या 'संसद चलो' मार्चदरम्यान आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला होता. संसद भवनाकडे आगेकूच करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी सुरक्षा रक्षकांनी बळाचा वापर करत लाठीचार्ज केला आणि अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या.

## भारत-इस्रायल मुक्त व्यापार कराराला वेग! दुसरी फेरी यशस्वी;

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारत आणि इस्रायल यांच्यात प्रस्तावित मुक्त व्यापार कराराच्या (एफटीए) दुसऱ्या फेरीतील चर्चा यशस्वीरीत्या पूर्ण झाली असून, दोन्ही देशांनी लवकरात लवकर संतुलित, सर्वसमावेशक आणि परस्पर हिताचा करार अंतिम करण्याची बांधिलकी पुन्हा व्यक्त केली आहे. २० ते २३ जुलै २०२६ दरम्यान नवी दिल्लीत झालेल्या या चर्चेनंतर केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने शुक्रवारी अधिकृत माहिती दिली.

प्रस्तावित मुक्त व्यापार करारात वस्तू आणि सेवा व्यापार, मूळ नियम, तांत्रिक अडथळे, बौद्धिक संपदा हक्क, सीमाशुल्क प्रक्रिया, व्यापार सुलभीकरण तसेच इतर महत्त्वाच्या आर्थिक विषयांचा समावेश आहे. दोन्ही देशांतील तज्ज्ञांनी विविध मुद्द्यांवर सखोल तांत्रिक चर्चा करून मतभेद कमी करण्याचा आणि सामंजस्याचे मुद्दे निश्चित करण्याचा प्रयत्न केला.

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या निवेदनानुसार, या फेरीतील चर्चा रचनात्मक आणि भविष्योन्मुख वातावरणात पार पडल्या. दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये अनेक क्षेत्रांमध्ये परस्परपूरकता असल्याने प्रस्तावित करारामुळे द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक आणि आर्थिक सहकार्याला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

भारत आणि इस्रायल यांच्यात संरक्षण, कृषी तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवउद्योग आणि उच्च तंत्रज्ञान या क्षेत्रांत आधीच मजबूत सहकार्य आहे. मुक्त व्यापार करार अस्तित्वात आल्यास या सहकार्याचा विस्तार होण्याबरोबरच दोन्ही देशांमधील उद्योगांना नवीन बाजारपेठा आणि अधिक सुलभ व्यापाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

## डेटावर सरकारचा कडक पहारा! देशाबाहेर दूरसंचार माहिती पाठविण्यास बंदी;

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशाच्या डिजिटल सुरक्षेला अधिक बळकटी देण्याच्या दिशेने केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत दूरसंचार पायाभूत सुविधा पुरवठादारांना देशाबाहेर कोणताही दूरसंचार डेटा पाठविण्यास बंदी घातली आहे. दूरसंचार विभागाने (डीओटी) जारी केलेल्या नव्या अधिसूचनेनुसार, संपूर्ण दूरसंचार माहिती भारतातच साठवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या नव्या नियमांचा फटका दूरसंचार सेवांसाठी क्लाऊड-आधारित जाळे चालविणाऱ्या कंपन्या, मोबाईल टॉवर सेवा पुरवठादार, उपग्रह संपर्क केंद्रे तसेच इतर दूरसंचार पायाभूत सुविधा पुरवठादारांना बसणार आहे. या कंपन्यांना आता भारतातील वापरकर्त्यांचा दूरसंचार डेटा देशाबाहेरील सर्व्हरवर साठवता किंवा सामायिक करता येणार नाही.

सरकारच्या अधिसूचनेनुसार, दूरसंचाराशी संबंधित सर्व माहिती, नोंदी आणि डिजिटल व्यवहार भारतातीलच माहिती केंद्रांमध्ये साठवणे अनिवार्य असेल. यामागे राष्ट्रीय सुरक्षा, सायबर हल्ल्यांपासून संरक्षण आणि संवेदनशील माहितीवर भारताचे नियंत्रण कायम ठेवणे हा सरकारचा उद्देश असल्याचे मानले जात आहे.

मात्र या निर्णयामुळे अनेक महत्त्वाचे प्रश्नही उपस्थित झाले आहेत. भारतात कार्यरत अनेक आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आणि क्लाऊड सेवा कंपन्या त्यांच्या जागतिक प्रणालीवर आधारित सेवा पुरवतात. अशा परिस्थितीत नव्या नियमांमुळे त्यांच्या कार्यपद्धतीत मोठे बदल करावे लागू शकतात. भारतात स्वतंत्र माहिती केंद्रे उभारणे, माहिती साठवणूक व्यवस्था बदलणे आणि नियामक अटींची पूर्तता करणे यासाठी मोठी गुंतवणूक करावी लागू शकते.

केंद्र सरकारचा हा निर्णय डिजिटल सार्वभौमत्व मजबूत करण्याच्या प्रयत्नाचा भाग मानला जात असला, तरी काही तज्ज्ञांच्या मते यामुळे डेटावर सरकारी नियंत्रण वाढेल का, आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपन्यांवर अतिरिक्त नियामक बोजा पडेल का आणि डिजिटल अर्थव्यवस्थेवर त्याचा काय परिणाम होईल, यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

## विद्यार्थ्यांना आंदोलनापासून रोखण्याचा प्रयत्न? दिल्ली विद्यापीठ-जेनयूच्या सूचनेवर काँग्रेसचा मोदी सरकारवर घणाघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

दिल्लीतील जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनांपासून दूर राहण्याचा इशारा दिल्ली विद्यापीठ (डीयू) आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने (जेनयू) विद्यार्थ्यांना दिल्यानंतर या मुद्द्यावर राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार टीका करत, विद्यार्थ्यांना दडपण्यासाठी प्रतिष्ठित विद्यापीठांचा वापर केला जात आहे, असा आरोप केला आहे.

काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर थेट निशाणा साधला. देशाच्या शिक्षण व्यवस्थेवर गंभीर चर्चा



करण्याऐवजी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याऐवजी, मोदी-शहा देशातील शिक्षण संस्थांची प्रतिष्ठा कमी करण्याचे काम करत आहेत, असा आरोप त्यांनी केला.

खरगे यांनी पुढे म्हटले की, देशातील उच्च शिक्षण संस्था या स्वतंत्र विचार, लोकशाही मूल्ये आणि बौद्धिक चर्चेची केंद्रे आहेत. मात्र, विद्यार्थ्यांना आंदोलनांपासून दूर राहण्याच्या सूचना देऊन या संस्थांचा वापर सरकारी प्रचाराचे माध्यम म्हणून केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. अशा प्रकारे विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याचाही आरोप काँग्रेसने केला आहे.

विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर दिल्ली विद्यापीठ आणि जेनयूने विद्यार्थ्यांना जंतर-मंतरवरील आंदोलनांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर या सूचनेवरून राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

## NEET पेपरफुटीनंतर सरकारची मोठी कारवाई; NTA मधील ४७ अधिकाऱ्यांची हकालपट्टी, परीक्षा व्यवस्थेत होणार मोठे बदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

नीट पेपरफुटी प्रकरणानंतर राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या **(NTA)** कामकाजावर सातत्याने प्रश्नचिन्हे उपस्थित होत असताना केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. **NTA** ने शुक्रवारी तब्बल ४७ अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली असून, काही अधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर आणि फौजदारी कारवाईही केली जाणार आहे. ही कारवाई **NTA** च्या संपूर्ण पुनर्रचनेचा भाग असल्याचे सांगितले जात आहे.

**पुढील महिन्यात NTA ची पुनर्रचना**

सूत्रांच्या माहितीनुसार, केंद्र सरकार **NTA** च्या प्रशासकीय रचनेत आणि कार्यपद्धतीत व्यापक बदल करण्याच्या तयारीत आहे. पुढील एका महिन्यात **NTA** ची पुनर्रचना केली जाण्याची शक्यता असून, त्याअंतर्गत परीक्षा घेण्याची पद्धत, प्रशासन आणि सुरक्षाव्यवस्थेत महत्त्वाचे बदल केले जाणार आहेत.

**NTA** च्या परीक्षा प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या आउटसोर्सिंग मॉडेलचाही आढावा घेतला जात आहे. परीक्षांचे आयोजन आणि इतर तांत्रिक प्रक्रिया यामध्ये सध्या वापरल्या जाणाऱ्या पद्धतींचे पुनर्मूल्यांकन करण्यात येत असून, तज्ज्ञ समितीच्या शिफारसींनुसार नवीन प्रणाली लागू केली जाणार आहे.

**'लीक-प्रूफ' परीक्षा प्रणाली तयार करण्यावर भर**

सरकारचे उद्दिष्ट पेपरफुटीला पूर्णपणे आळा घालणारी 'लीक-प्रूफ' परीक्षा प्रणाली विकसित करण्याचे आहे. यामुळे राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा अधिक पारदर्शक,




सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**NTA** दरवर्षी गएए, छएएढ, उणएढ यांसह १५ ते २० राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा आयोजित करते. अलीकडील पेपरफुटीच्या घटनांनंतर संस्थेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाल्यामुळे सुधारणा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

**शिक्षण मंत्रालयातही मोठा बदल**

**NEET** पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने शिक्षण मंत्रालयातही मोठा प्रशासकीय बदल केला आहे. सरकारने उच्च शिक्षण विभागाचे सचिव विनीत जोशी यांची बदली करून त्यांच्या जागी नरेश पाल गंगवार यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना गुरुवारी उशिरा रात्री जारी करण्यात आली.

**NTA मध्ये सध्या किती कर्मचारी?**


**NTA** ही केंद्र सरकारच्या अंतर्गत कार्यरत स्वयं-अर्थसहाय्यित संस्था आहे. सध्या संस्थेमध्ये, २२ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर, ३८ करारावर नियुक्त कर्मचारी, १३८ आउटसोर्स कर्मचारी, तसेच एक कर्मचारी मूळ विभागातून **NTA** मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

याशिवाय, २९ ऑक्टोबर २०२४ रोजी सरकारने १६ नवीन पदांची निर्मिती केली होती. त्यामध्ये ८ संचालक आणि ८ संयुक्त संचालक स्तरावरील पदांचा समावेश आहे.

**परीक्षा व्यवस्थेतील सुधारणांना वेग**

**NEET** पेपरफुटीनंतर केंद्र सरकारने उचललेल्या या पावलाकडे राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता, जबाबदारी आणि विश्वासार्हता वाढविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. आगामी काळात **NTA** मध्ये आणखी मोठे प्रशासकीय आणि तांत्रिक बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# 3 कोटी तरुण व्यसनाच्या विळख्यात? १,९०६ कोटींच्या साम्राज्यावर ईडीचा घाव!




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशभरात ऑनलाइन वास्तविक पैशांवर आधारित खेळांच्या वाढत्या प्रभावावर अखेर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत गेम्सक्राफ्ट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. आणि संबंधित संस्थांच्या १,९०६ कोटींच्या मालमत्तांवर जप्ती केली आहे. २२ जुलै २०२६ रोजी मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए) अंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईची माहिती शुक्रवारी जाहीर करण्यात आली. ऑनलाइन जुगारसदृश व्यवहारांवर झालेल्या सर्वात मोठ्या कारवायांपैकी ही एक मानली जात आहे.

ईडीच्या तपासानुसार रम्मीकल्चर, रम्मीप्राईम, प्लेशीप आणि रम्मीटाईम या मोबाईल अनुप्रयोगांद्वारे वास्तविक पैशांवर आधारित खेळ चालवले जात होते. या माध्यमातून सुमारे ३ कोटी खेळाडू जोडले गेले असून त्यातील मोठा वर्ग तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांतील असल्याचे तपासात नमूद करण्यात आले आहे.

तपास यंत्रणेचा गंभीर आरोप असा आहे की या खेळांची संपूर्ण रचना खेळाडूंना वारंवार पैज लावण्यासाठी, अधिक वेळ खेळण्यासाठी आणि अधिक पैसा खर्च करण्यासाठी तयार करण्यात आली होती. विविध प्रोत्साहनपर योजना, रोख बक्षिसे, सवलती आणि आकर्षक लाभ देऊन खेळाडूंना सतत गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न केला जात होता. ईडीच्या मते, ही केवळ मनोरंजनाची साधने नव्हती, तर आर्थिक व्यवहारांचे मोठे जाळे बनले होते.

या कारवाईत बँक ठेवी, मुदत ठेवी, सामूहिक गुंतवणूक निधी, समभाग, रूपांतरित कर्जरोखे, शेतगृह तसेच निवासी आणि व्यावसायिक स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. या मालमत्ता केवळ कंपनीच्या नावावर नसून भागधारक, त्यांच्या कुटुंबीय, खासगी कौटुंबिक विश्वस्त संस्था आणि संबंधित कंपन्यांच्या नावावर असल्याचा ईडीचा दावा आहे.

या प्रकरणामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. जर ३ कोटी नागरिक अशा आर्थिक व्यवहारांशी जोडले गेले होते, तर नियामक यंत्रणा नेमकी काय करत होती? ऑनलाइन वास्तविक पैशांवर आधारित खेळांचा विस्तार होत असताना केंद्र आणि राज्य सरकारांनी वेळेवर प्रभावी नियंत्रण का आणले नाही? आर्थिक व्यवहार, करप्रणाली आणि डिजिटल नियंत्रण यंत्रणांकडून यापूर्वी कोणती पावले उचलण्यात आली होती? आज या प्रश्नांची उत्तरे मागितली जात आहेत.

गेल्या काही वर्षांत ऑनलाइन वास्तविक पैशांवर आधारित खेळांचा उद्योग हजारो कोटी रुपयांच्या उलाढालीपर्यंत पोहोचला. मात्र त्याचवेळी व्यसन, आर्थिक नुकसान, कर्जबाजारीपणा, करचुकवेगिरी आणि कथित मनी लॉन्डरिंग यांसारख्या मुद्द्यांवर सातत्याने चिंता व्यक्त केली जात होती. अनेक राज्यांनी अशा खेळांवर निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला, परंतु न्यायालयीन प्रक्रियेमुळे अनेक कंपन्या व्यवसाय सुरू ठेवत राहिल्या.

या कारवाईमुळे केवळ एका कंपनीवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले नाही, तर भारतातील ऑनलाइन वास्तविक पैशांवर आधारित खेळांच्या संपूर्ण नियमन व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. लाखो नव्हे तर कोट्यवधी नागरिक या माध्यमांवर आर्थिक व्यवहार करत असताना शासनाची देखरेख पुरेशी होती का, यावर आता व्यापक चर्चा होण्याची शक्यता आहे.

तथापि, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की ईडीने केलेले सर्व आरोप अद्याप न्यायालयात सिद्ध झालेले नाहीत. ही तात्पुरती जप्ती असून अंतिम निर्णय न्यायालयीन प्रक्रियेनंतरच होईल. मात्र १,९०६ कोटींच्या जप्तीने ऑनलाइन वास्तविक पैशांवर आधारित खेळ उद्योगाला मोठा धक्का बसला असून येत्या काळात या क्षेत्रावर आणखी कठोर नियमन लागू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.